**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११002**

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य/२०२१/माजी.सै.पा.शै.सवलत.2626 दि.१५.०३.२०२२

21 MAR 2022

**प्ररिपत्रक**

विषय :- माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना.

संदर्भ :- १. शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र. एन.डी.एफ. १०७९/२२२९२० (५३७)/साशि-५, दि. १४ जानेवारी, १९८५
२. शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एन.डी.एफ. १०९४/(१६६८/९४)/ तांशि-५, दि. १३ सप्टेंबर, १९९४
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. १००६/(१६०/०६) मशि-६, दि. ९.०२.२००७
४. माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्र. साप्रवि-मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२ ऑक्टोंबर, २०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये, राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलत देय आहे. सदर योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्याचे अधिकार प्रमाणपत्र धारण करणाऱ्या किंवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर वा नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत (वा या हुद्दापेक्षा कमी हुद्यावरुन) निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना / मुलींना / पत्नींना / विधवांना शैक्षणिक सवलत देण्यात येते.

- **सवलतीचा लाभ मिळण्यासाठी पात्रता :-**

१. महाराष्ट्र राज्याचे रहिवास दाखला किंवा पालकांचे माजी सैनिकांचे महाराष्ट्रात भरती / सेवानिवृत्त झालेबाबतचे प्रमाणपत्र.
२. जिल्हाधिकारी आणि अध्यक्ष डी.एस.अॅन्ड ए. बोर्ड यांचेकडील माजी सैनिक प्रमाणपत्र.
३. मागील वर्षाची गुणपत्रिका
४. बोनाफाईड प्रमाणपत्र.

- **शैक्षणिक सवलतीचे स्वरुप :-**

१. राज्यातील मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत शिक्षणाच्या सर्व स्तरावर फी माफीची सवलत. मोफत शिक्षणाची सवलत म्हणजे शिक्षण फी, सत्र फी, प्रवेश फी, ग्रंथालय फी व प्रयोगशळा फी लाभ देय आहे.
२. या योजनेखालील नियमानुसार फी माफीची सवलत देय असलेल्या कोणत्याही विद्याार्थ्यांकडून संस्थेने फी आकारु नये.
३. शासन मान्य व अनुदानित अशासकीय संस्थांना अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षण फी, प्रयोगशाळा फी, ग्रंथालय फी व प्रवेश फी व सत्र फी ची प्रतिपुर्ती करण्यात येईल. मात्र ज्या ठिकाणी १०० टक्के वेतन अनुदान देण्यात येते अशा संस्थांना शिक्षण फी च्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही. किंवा ज्या शासकीय संस्थांना अनुदान

देताना त्यात शैक्षणिक शुल्काचा समावेश करुन अनुदान दिले जात असेल तर त्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही.

४. शासकीय संस्थांबाबत अशा विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत दिल्यामुळे त्यांच्या उत्पन्नातील तुट ही महसुली तोटा म्हणून समजण्यात येईल.

- **सवलतीचे नुतनीकरण करणे व इतर शर्ती :-**

१. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहीत अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.

२. वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास अथवा वरच्या वर्गात पदोन्नत न झाल्यास या सवलती स्थगित ठेवण्यात येतील. मात्र जर नंतर विद्यार्थी वरच्या वर्गात पदोन्नत झाला की त्यास ही सवलत पुढे चालू ठेवण्यात येईल. म्हणजे एकाच वर्गात (अथवा तत्सम वर्गात) या सवलतीचा लाभ दोन वेळा दिला जाणार नाही.

३. या सवलतीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीस अन्य दुसऱ्या योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच एकाच वेळी एका विद्यार्थ्याला एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांना या सवलतीचा लाभ दिला जाणार नाही.

४. जर असे आढळून आले की, पात्रता प्रमाणपत्र मिळण्यासाठी / सवलतीचा लाभ मिळण्यासाठी अर्जात चुकीची माहिती देण्यात आली तर या योजनेखालील सवलत रद्द करण्यात येईल.

माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती या योजनेची शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलवरुन अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी सदर योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे तसेच शासन निर्णयानुसार विहीत केलेले आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन सदरहू अर्जाची दिलेल्या मुदतीमध्ये विनाविलंब पडताळणी करावी. योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचेच अर्ज पुढील टप्प्यावर ऑनालाईन पध्दतीने मंजूरीसाठी पाठविण्यात यावेत.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता सदरहू योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरुन दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आलेली असून, सर्व पात्र विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावे.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

प्रत :-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
४. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.